स्थापना १९९७

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : टी.एन.ए.(टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७

## सादर आहे आपल्या सेवेची यशस्वी १० वर्षे




## १० वा वार्षिक अहवाल सन २००६ - ०७

# विद्यमान संचालक मंडळ



**श्री. कैलास वि. खोपडे**
अध्यक्ष



**श्री. दशरथ आ. बडदे**
उपाध्यक्ष



**श्री. बाळासाहेब वि. ताकवले**
सचिव



**श्री. कृष्णा पां. धुमाळ**
खजिनदार



**श्री. दिपक शं. टेळे**
संचालक



**श्री. श्रीपती शं. गरुड**
संचालक



**श्री. शंकर रा. पुली**
संचालक



**सौ. मंदा ज्ञा. खोपडे**
संचालिका



**श्री. अमृत दा. पाटील**
संचालक



**श्री. अनंत ना. प्रभाळे**
संचालक



**श्री. आनंदा बा. आंबवले**
संचालक



**श्री. सचिन य. रणनवरे**
कर्मचारी प्रतिनिधी



**श्री. विजय बं. मोरे**
मुख्य कार्य. अधिकारी

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि.नं. टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस.आर./सी.आर. ९५१/९७

मुख्य कार्यालय : ए/३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

## दहावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **दहावी सर्वसाधारण सभा रविवार दि. १२ / ८ / २००७ रोजी सकाळी १०.३० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. १३/८/२००६ रोजी झालेल्या नवव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००७ अखेरचे कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००६-२००७ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४) सन २००६-२००७ च्या लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.

५) सन २००७-२००८ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करून मानधन ठरविणे.

६) सन २००७-२००८ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई — संचालक मंडळाच्या वतीने

दिनांक : २३/०७/२००७ — **श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले**

(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही व त्या सभेत वरील नोटिसीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार केला जाईल.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजित सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची ही प्रत कृपया बरोबर आणावी.

### कार्यालयीन वेळ

| | | | |
|---|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | - | सकाळी | १०.०० ते ०१.३० |
| | - | दुपारी | ०२.३० ते ०६.०० |
| शनिवार | - | सकाळी | १०.०० ते ०१.३० |

## १० वा वार्षिक कार्य अहवाल सन २००६-२००७

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १० वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

### संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु. लाखात)

| तपशिल | ३१/०३/२००६ रु. | ३१/०३/२००७ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ८३.३९ | ९५.३६ | ११.९७ | १४.३५ |
| राखीव व इ. निधी | ७२.४१ | ८९.८० | १७.३९ | २४.०१ |
| सभासद ठेवी | ११०२.३८ | १५०७.८९ | ४०५.५१ | ३६.७८ |
| गुंतवणूक | ३०२.९९ | ३३२.५२ | २९.५३ | ९.७५ |
| सभासद कर्जे | ८०४.५५ | ११८२.०० | ३७७.४५ | ४६.९१ |
| खेळते भांडवल | १२९६.१२ | १७३२.६७ | ४३६.५५ | ३३.६८ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पूर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद :- ४५९५

गतवर्षी संस्थेचे ४१०७ सभासद होते, अहवाल वर्षात ६९७ नवीन सभासद झाले आणि २०९ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ४५९५ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल :- रु. ९५.३६ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ८३,३८,५०० इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ११,९७,२००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००७ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ९५,३५,७००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी :- रु. ८९.८० लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समानिकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, तसेच सेवक ग्रॅज्युईटी निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. ७२,४०,५२५/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. १७,३९,४६७/- ने वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण स्वनिधी रुपये ८९,७९,९९२/- इतका झाला आहे.

## ठेवी :- रु. १५०७.८९ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. ११,०२,३८,३६९/- होत्या. त्यामध्ये रु. ४,०५,५१,११०/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००७ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. १५,०७,८९,४७९/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण ३७% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००३-०४ | सन २००४-०५ | सन २००५-०६ | सन २००६-०७ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ९५,१७,४६३.०० | ९३,०८,३३३.०० | १,०५,७२,२०७.०० | १,४९,३४,३७४.०० |
| दैनंदिन बचत ठेव | १,१०,१५,१८४.०० | १,३७,७३,९४६.०० | २,०९,६८,३०८.०० | २,९३,१५,८३५.०० |
| अल्प मुदत ठेव | ६४,७१,५२९.०० | ७०,१६,२९१.०० | ९१,९१,४०८.०० | १,९४,६७,८००.०० |
| मुदत ठेव | ८०,५८,३०९.०० | ९७,८१,३१९.०० | १,३२,१२,६६०.०० | १,९२,७५,१४६.०० |
| दामदुप्पट ठेव | १,५३,९७,८२५.०० | १,७३,६१,४२३.०० | १,८२,८१,४२९.०० | १,८५,५१,५६७.०० |
| पारिजात बक्षिस १९९८ | ९,३५,२७५.०० | ६,६३,७७४.०० | १,५०,६७६.०० | ७५,५३५.०० |
| पारिजात बक्षिस २००० | ३६,५८,४२२.०० | ३८,७८,५७४.०० | ३६,७७,३६४.०० | ३,१६,००३.०० |
| संकल्प सिद्धी ठेव | १९,५९,१४५.०० | ४०,३२,४००.०० | ३१,५७,९९६.०० | ३०,२८,३३४.०० |
| सिद्धी ठेव | ३२,५७,०६१.०० | २९,१४,९१८.०० | २९,६०,०६१.०० | ३१,१४,६८२.०० |
| मासिक प्राप्ती ठेव | ४४,१८,०००.०० | ५९,५४,६७५.०० | ९९,०२,७२५.०० | १,५६,६४,२७५.०० |
| आवर्त ठेव | १५,५७,६३७.०० | १९,८४,७६२.०० | १८,८५,२३४.०० | २२,२८,३९५.०० |
| सभासद ठेव | ३५,५१,१४४.०० | ४५,२१,४७१.०० | ४१,९०,१०८.०० | ३२,८२,७२३.०० |
| शुभकार्य ठेव | २६,२१,४९०.०० | ६३,७५,७४२.०० | १,२०,८८,१९३.०० | २,१५,३४,८१०.०० |
| एकूण रु. | ७,२४,१८,७८४.०० | ८,७५,६७,६२८.०० | ११,०२,३८,३६९.०० | १५,०७,८९,४७९.०० |

## गुंतवणूक :- रु. ३३२.५२ लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. ३,०२,९८,८५०/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. २९,५३,०००/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. ३,३२,५१,८५०/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ९.७५% एवढे आहे.

| गुंतवणूक तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा.रा.सह.पत.फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी | २८,२८,८५०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | ९,३५,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | १,६५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ४६,०००.०० |
| सेवक ग्रॅज्युईटी व कल्याण निधी | ९९,०००.०० |
| धर्मादाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | २,९१,१५,०००.०० |
| एकूण रु. | ३,३२,५१,८५०.०० |

## कर्ज :- रु. ११८२.०० लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु. ८,०४,५४,७५५/- कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु. १०,९५,६८,१३८/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. ७,१८,२२,६१२/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ११,८२,००,२८१/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी - प्रमाण ४.९०%

मा. सहकार आयुक्तांनी सन २००५-०६ पासुन "अनुत्पादीत कर्जाचे" (N.P.A.) निकष पतसंस्थासाठी लागू केले आहेत. परिणामी संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत.
मार्च २००७ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण ४.९०% आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शेकडा प्रमाण १.०७% ने कमी झाले आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थांना सुद्धा एन.पी.ए. निकष लागू केले व अनुत्पादक कर्जांची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २००७ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ४.०७% आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे १५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जांची संस्थेने १००% पेक्षा अधिक (१०७%) तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २००७ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | आवश्यक तरतूद | प्रत्यक्ष तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | उत्पादित जिंदगी | ११२५.११ | --- | --- |
| २. | अनुत्पादीत जिंदगी | | | |
| | अ) सर्वसधारण जिंदगी | ३४.९७ | १.७५ | २.३५ |
| | ब) संशयीत जिंदगी | २१.९१ | ६.७८ | ६.७८ |
| | क) बुडीत जिंदगी | --- | --- | --- |
| | एकूण | ११८१.९९ | ८.५३ | ९.१३ |

## खेळते भांडवल :- रु. १७३२.६७ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. १२९६.१२ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल ३३.६८% प्रमाणे रु. ४३६.५५ लाखाने वाढून रु. १७३२.६७ लाख इतके झाले

## संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी मागिल वर्षापासून महिन्यातून दोन सभा घेण्यास सुरवात झाली आहे. त्यानुसार अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १५ सभा झालेल्या आहेत तसेच यापुर्वी कर्ज मंजुरी समितीच्या महिन्यातून दोन सभा होत असत. कर्ज मागणी करणाऱ्या सभासदास अधिक तत्पर सेवा देण्याच्या हेतुने त्यामध्ये वाढ करून दरमहा ३ सभा घेण्यात आल्या. त्यानुसार अहवाल वर्षात कर्ज मंजुरी समितीच्या एकूण ३० सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कामकाज नियंत्रण, कर्जवसूली यासाठी सुद्धा सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :-

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी टप्पा टप्प्याने पाठविले. सहकारी बँकींग क्षेत्रातील बदलते आर्थिक धोरण, शासनाचे येणारे नवनवीन निकष व निर्बंध यासाठी पतसंस्थाचे धोरण ठरविणाऱ्या संचालकांनी सुध्दा प्रशिक्षण घेणे ही आजची मोठी गरज आहे. याच जाणीवेतून संस्थेचे पाच पदाधिकारी संचालक यांनी महाराष्ट्र शासनाच्या "यशदा" या प्रशिक्षण केंद्रात जाऊन तीन दिवसीय प्रशिक्षण शिबीर पुर्ण केले.

## नफा विभागणी :- रू. १०.९३ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रू. १०,९२,६६७.८७ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रू.४४०.२४ मिळुन नफा रू.१०,९३,१०८.११ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | २,७३,२७७.०० |
| लाभांश (५% प्रमाणे) | ४,१६,९२५.०० |
| इमारत निधी | २,००,०००.०० |
| बुडित कर्ज निधी | १,२२,५००.०० |
| थकीत व्याज तरतूद | ५०,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | १०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १०,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | ५,०००.०० |
| आकस्मिक निधी | ५,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | ४०६.११ |
| एकूण रु. | १०,९३,१०८.११ |

## लेखापरिक्षण :-

संस्थेची सन २००६-०७ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. रतिकांत आर. पिंगळे चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

## उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

**१) कोपरखैरणे शाखा उद्घाटन सोहळा :-**

संस्थेच्या कोपरखैरणे शाखेचे उद्घाटन दि. १० डिसेंबर २००६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर

मा. सौ. मनिषाताई भोईर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या उद्‌घाटन सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून नवी मुंबईचे प्रथम महापौर मा. श्री. संजीवजी नाईक, नगरसेवक श्री. विजय माने, श्री. कोंडीबा तिकोणे, श्री. रामदास पवळे, श्री. केशव म्हात्रे, श्री. सुरेश सालदार, श्री. नारायण बांदल व अन्य मान्यवर उपस्थित होते.

**२) सिंहगड रोड शाखा उद्‌घाटन सोहळा :-**

संस्थेच्या सिंहगड रोड शाखेचे उद्‌घाटन दि. २१ जानेवारी २००७ रोजी मा. आ. श्री. कुमारभाऊ गोसावी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या उद्‌घाटन सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून पूणे महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. अनुपमा लिमये तसेच श्री संपत (आप्पा) वाल्हेकर, श्री. संपतराव भोसले गुरुजी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

**३) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-**

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनिमय केंद्र पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात येत आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थांमध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम ''पारिजात'' संस्थेने मिळविला आहे.

## आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्याचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. तुर्भे, नवी मुंबई को-ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, आय. डी .बी. आय. बँक, राजर्षी शाहु सहकारी बँक, यु. टी. आय. बँक, सोपानकाका ना. सह. बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री. आर. आर. पिंगळे, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स्, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झाले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी
**कैलास वि. खोपडे**
अध्यक्ष

दि. ३१ मार्च २००७

| सन २००५-०६ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| ८३,३८,५००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | ९५,३५,७००.०० |
| | राखीव निधी व इतर निधी : | | |
| २२,१३,१४७.०० | राखीव निधी | २८,१०,६७२.०० | |
| ३८,३०,८६६.०० | इमारत निधी | ४८,२३,२२६.०० | |
| ८,१३,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ९,१३,०००.०० | |
| १,५५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,६५,०००.०० | |
| ३५,१५२.०० | सभासद कल्याण निधी | ४५,१५२.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४३,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४३,०००.०० | |
| २१,३६१.०० | सहकार प्रशिक्षण निधी | २६,२१८.०० | |
| ५४,०००.०० | सेवक ग्रॅज्युईटी निधी | ६८,७२५.०० | |
| २१,०००.०० | दशकपुर्ती सोहळा निधी | ०.०० | |
| ०.०० | आकस्मिक निधी | ३१,०००.०० | ८९,७९,९९२.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| १,०५,७२,२०७.०० | बचत ठेव | १,४९,३४,३७४.०० | |
| २,०९,६८,३०८.०० | दैनंदिन बचत ठेव | २,९३,१५,८३५.०० | |
| ४१,९०,१०८.०० | सभासद ठेव | ३२,८२,७२३.०० | |
| ९१,११,४०८.०० | अल्प मुदत ठेव | १,९४,६७,८००.०० | |
| १,३२,१२,६६०.०० | मुदत ठेव | १,९२,७५,१४६.०० | |
| १,८२,८१,४२९.०० | दामदुप्पट ठेव | १,८५,५१,५६७.०० | |
| १,५०,६७६.०० | पारिजात बक्षीस ठेव-१९९८ | ७५,५३५.०० | |
| ३६,७७,३६४.०० | पारिजात बक्षीस ठेव-२००० | ३,१६,००३.०० | |
| २९,६०,०६१.०० | सिद्धी ठेव-२००१ | ३१,१४,६८२.०० | |
| ३१,५७,९९६.०० | संकल्प सिद्धी ठेव-२००३ | ३०,२८,३३४.०० | |
| ९९,०२,७२५.०० | मासिक प्राप्ती ठेव | १,५६,६४,२७५.०० | |
| १८,८५,२३४.०० | आवर्त ठेव | २२,२८,३९५.०० | |
| १,२०,८८,१९३.०० | शुभकार्य ठेव | २,१५,३४,८१०.०० | १५,०७,८९,४७९.०० |
| | **इतर देणी व तरतूदी :** | | |
| ७,४१,३८८.०० | ठेवीवरील देय व्याज | ८,९४,२८७.०० | |
| ७,०१,६६६.०० | लाभांश देणे | ५,८६,३५१.०० | |
| २०,९१६.०० | रिटेंशन मनी | १५,०००.०० | |
| १६,५८२.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | २८,१२१.०० | |
| १२,७२,९७,९४६.०० | पुढील पानवर........ | | १६,९३,०५,१७१.०० |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००५-०६ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| २,६६,७००.०० | रोख शिल्लक | ७,८९,६१५.५१ | |
| ७,७१,७२५.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | ९,५०,४०५.०० | |
| २,५२,२६०.०० | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | ३३,११७.५० | |
| १८,६९७.०० | दि. ठाणे जि.म.सह.बँक | १०,५९२.०० | |
| ९,९५,२३२.७४ | नवी मुंबई को-ऑप.बँक | ७३,१६२.७९ | |
| १,८७,३१४.०० | अभ्युदय को-.ऑप.बँक | २,११,५३०.०० | |
| ३,५४,४७६.५० | नॅशनल को-ऑप.बँक | १७,८७६.०० | |
| ४,०६,०१९.०० | अजित सहकारी बँक लि. | ४०,८१४.०० | |
| ८,७३९.०० | राजश्री शाहू सह. बँक लि.-पुणे | ५१,३६१.०० | |
| ३,३७५.०० | परिवर्तन को-ऑप. बँक लि. | १,३७५.०० | |
| ०.०० | यु.टी.आय. बँक लि. | ६९,७२९.३१ | |
| ५९,०८७.०० | आय.डी.बी.आय.बँक लि. | ०.०० | २२,४९,७३८.११ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जि.मध्य.सह.बँक-भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.रा.सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| १९,३०,८५०.०० | ठाणे जि.म.सह.बँक-राखीव निधी | २२,७८,८५०.०० | |
| ३,००,०००.०० | महाराष्ट्र रा. सह. बँक-राखीव निधी | ५,५०,०००.०० | |
| १,४५,०००.०० | ठाणे जि.म.बँक-लाभांश.समा.निधी | १,४५,०००.०० | |
| १०,०००.०० | महा. रा. सह. बँक-लाभांश.समा.निधी | २०,०००.०० | |
| १०,१०,०००.०० | ठाणे जि.म.बँक-संश.व बु.कर्ज निधी | ६,६०,०००.०० | |
| २,५०,०००.०० | महा. राज्य सह.बँक-संश.व बु.कर्ज निधी | २,७५,०००.०० | |
| ५९,०००.०० | ठाणे जि.म.बँक-धर्मादाय निधी | ५९,०००.०० | |
| २१,०००.०० | ठाणे जि.म.बँक-सभा, कल्याण निधी | २१,०००.०० | |
| १५,०००.०० | महा. राज्य सह.बँक-सभा. कल्याण निधी | २५,०००.०० | |
| ७४,०००.०० | ठाणे जि.म.सह.बँक-कर्म. ग्रॅ व कल्याण नि. | ७४,०००.०० | |
| २५,०००.०० | महा. रा. सह.बँक-कर्म.ग्रॅ.व कल्याण निधी | २५,०००.०० | |
| ७८,५५,०००.०० | ठाणे जि.म.सहकारी बँक-मुदत ठेव | ७७,४०,०००.०० | |
| २८,००,०००.०० | महाराष्ट्र सहकारी बँक लि.-मुदत ठेव | २३,७५,०००.०० | |
| ८५,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक-मुदत ठेव | १,१२,००,०००.०० | |
| १०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप बँक लि. -मुदत ठेव | २०,००,०००.०० | |
| १८,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप बँक-मुदत ठेव | १८,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | नवी मुंबई को.-ऑप बँक - मुदत ठेव | १८,००,०००.०० | |
| ११,००,०००.०० | नॅशनल को-ऑप बँक -मुदत ठेव | ५,००,०००.०० | |
| १४,००,०००.०० | अजित सहकारी बँक लि.-मुदत ठेव | ७,००,०००.०० | |
| ०.०० | यु.टी.आय. म्युचअल फंड | १०,००,०००.०० | ३,३२,५१,८५०.०० |
| ३,३६,२२,४७५.२४ | पुढील पानवर........ | | ३,५५,०१,५८८.११ |

दि. ३१ मार्च २००७

| सन २००५-०६ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १२,७२,९७,९४६.०० | **मागील पानवरुन........** | | १६,९३,०५,१७१.०० |
| ३,५००.०० | शेअर्स अनामत खाते | १२,८००.०० | |
| ३,२४०.०० | व्यवसाय कर | ३,५४५.०० | |
| ६,०६४.०० | आय कर टि.डी.एस. | १७,३५८.०० | |
| २५,०६९.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | २२,६७०.०० | |
| १,२०,०००.०० | लेखापरिक्षण फी | १,४६,२४३.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ४,२२५.०० | कर्मचारी विमा हप्ता | ६,०१०.०० | |
| १०,०००.०० | अतिरिक्त लाभ कर | १०,०००.०० | |
| ९,८५०.०० | टेलिफोन बिल | १३,३००.०० | |
| १९,५००.०० | विज बिल | १७,६००.०० | |
| ०.०० | व्यवसायिक फी | ४,०००.०० | |
| ०.०० | इतर खर्च | २८,७००.०० | १८,१०,९८५.०० |
| ९,४१,५००.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | १०,५७,५००.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| ७५.७४ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ४४०.२४ | |
| ११,६६,२४४.५० | अधिक : चालू वर्षाचा नफा | १०,९२,६६७.८७ | १०,९३,१०८.११ |
| १२,९६,१२,२१४.२४ | **एकुण** | | १७,३२,६६,७६४.११ |

दिनांक : १६-७-२००७
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

**श्री. रतिकांत आर. पिंगळे**
अंतर्गत हिशोब तपासणीस

**श्री. विजय बं. मोरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००५-०६ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ३,३६,२२,४७५.२४ | मागील पानवरुन........ | | ३,५५,०१,५८८.११ |
| | **सभासद कर्जे :** | | |
| १,५१,६८,९११.०० | वैयक्तिक /जामिनकी कर्ज | २,८५,६३,२१९.०० | |
| १,२३,५३,५५१.०० | व्यवसाय कर्ज | ६२,४३,४०८.०० | |
| २०,९२,२७८.०० | वाहन तारण कर्ज | ५३,८७,४९८.०० | |
| २,५४,९६,६२८.०० | सुरक्षित तारण कर्ज | ४,९२,३२,३०४.०० | |
| १,०४,४२,०४१.०० | इतर तारण कर्ज | १,०६,६०,०२०.०० | |
| २,६८,६०७.०० | शासकीय रोखे कर्ज | १०,२२,८४८.०० | |
| १७,०२,४४२.०० | दावा दाखल कर्ज | ६,४६,०८४.०० | |
| ४,४२,१३२.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ४,४१,०८१.०० | |
| २,०८,५३३.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,६७,४१६.०० | |
| ४,६८,१२३.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ३,३४,६७७.०० | |
| ५,७०,९८९.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | ५,४५,८७४.०० | |
| १,०७,१३,९११.०० | ठेव तारण कर्ज | १,४१,३२,८८९.०० | |
| ५,२६,६०९.०० | सोने तारण कर्ज | ८,२२,९६३.०० | ११,८२,००,२८१.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| २२,७५,४७८.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | २७,५९,३३४.०० | |
| ६,२०,२२५.०० | संगणक खाते | ९,५३,४६९.०० | |
| १,२८,८५४.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | २,२१,१२०.०० | |
| २४,८४८.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ६४,६३२.०० | |
| ५२,४५४.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | १,४३,२०४.०० | |
| १२,१४,५१६.०० | इमारत खाते | ७८,०४,८५०.०० | |
| २९,१०३.०० | डेली कलेक्शन मशीन | २७,७४६.०० | |
| १,९३६.०० | ग्रंथालय खाते | १,७६९.०० | १,१९,७६,१२४.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ९,०९,०३५.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | १०,५७,४६७.०० | |
| ४०,२९,६४४.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | ५५,४७,०१३.०० | ६६,०४,४८०.०० |
| | **इतर येणी :** | | |
| २,७५,०००.०० | कार्यालय अनामत | ४,५०,०००.०० | |
| १३,३५३.०० | एम.टी.एन.एल. अनामत | ८,८००.०० | |
| २४,२१०.०० | एम.एस.ई.बी. अनामत | २४,२१०.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. अनामत | ५,०००.०० | |
| १,८३,९७३.०० | स्टेशनरी स्टॉक | २,६५,६९५.०० | |
| ५,६३०.०० | मुद्रांक साठा | ११,१९०.०० | |
| २०,६९९.०० | आगाउ विमा | २७,८६१.०० | |
| १,३२१.०० | टि.डी.एस. येणे खाते | १,३८७.०० | |
| १,१०,६०५.०० | प्राथमीक खर्च (शाखा उद्घाटन) | १,१७,७२३.०० | ९,११,८६६.०० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ५८,१००.०० | दै. ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | ७२,४२५.०० | |
| ५५,५१,०००.०० | मुख्य कार्यालय इमारत | ०.०० | ७२,४२५.०० |
| **१२,९६,१२,२१४.२४** | **एकुण** | | **१७,३२,६६,७६४.११** |

| श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २००७

| सन २००५-०६ रु. पैसे | खर्च | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|
| ७२,७५,२१४.०० | सभासद ठेवीवरील व्याज | ८८,३३,६८३.०० |
| १४,६४,९१८.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ता | १८,२४,५९६.०० |
| १,३१,४४८.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व व्याज | १,५२,८३४.०० |
| १०,०००.०० | कर्मचारी सेवा निवृत्त निधी | ४१,५००.०० |
| १८,६४,८५१.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | २७,२५,९६०.०० |
| २,९९,५००.०० | कार्यालय भाडे | ४,२५,५००.०० |
| १,५२,३६२.०० | छपाई व स्टेशनरी खर्च | २,०१,१३९.५० |
| २८,१७४.०० | वार्षिक अहवाल खर्च | ५२,०००.०० |
| १,१८,४२२.५० | किरकोळ खर्च | १,१५,६८३.०० |
| १,४१,९७५.०० | विज खर्च | २,०१,५४३.०० |
| १,०७,५८६.०० | टेलिफोन खर्च | १,०१,८४१.०० |
| ६५,६५०.०० | प्रवास खर्च | ६६,८१८.०० |
| २१,६४६.०० | विमा खर्च | ३२,११३.०० |
| १७,२६५.०० | तार व टपाल खर्च | ८,३६३.०० |
| ४०,४७२.०० | कार्यालय दुरूस्ती व देखभाल खर्च | २१,०७२.०० |
| ३,४१८.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ५,१३२.०० |
| ८१,५०५.०० | संगणक दुरूस्ती व देखभाल खर्च | ४,८८१.०० |
| ०.०० | संगणक दुरूस्ती व देखभाल (AMC) | १,१८,१८८.०० |
| २,६००.०० | वातानुकूलीत यंत्रे (AMC) | २,६००.०० |
| १२,०००.०० | कार्यालय साफसफाई (AMC) | ६,०००.०० |
| १,३५०.०० | डेली मशिन (AMC) | १६,१०२.०० |
| ७,३६४.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | ९,८२२.०० |
| ३,६२०.०० | कार्यालय देखभाल शुल्क | ४,६५९.०० |
| ३८,७६९.०० | कार्यालय साफसफाई खर्च | ४२,१०५.०० |
| १,३३,४७२.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/अंतर्गत) | १,४५,०००.०० |
| १२,०२२.०० | कायदे विषयक सल्लागार फी | ४०,४३०.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| १,५००.०० | सभासदत्व व वर्गणी | १,१००.०० |
| २,५५१.०० | अपादग्रस्त मदत निधी | ०.०० |
| १३,४८५.०० | पुजा खर्च | २६,६३४.०० |
| १३,०३३.०० | बँक चार्जेस | १६,०१२.८० |
| १,२०,८४,६७२.५० | पुढील पानवर....... | १,५२,६३,५८७.३० |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २००५-०६ रु. पैसे | उत्पन्न | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|
| २१,५३,८७३.०० | गुंतवणूकीवरील व्याज | २६,४७,२७६.०० |
| १,१६,३७,५९०.०० | सभासद कर्जावरील व्याज | १,४२,८१,९५०.०० |
| ५३,८६०.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | ७५,५०२.०० |
| १,५३,१५८.०० | फॉर्म फी, सर्व्हिस चार्जेस इ. | ३,४७,१०६.७२ |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| १,३९,९८,६३१.०० | पुढील पानवर....... | १,७३,५१,९८४.७२ |

दि. ३१ मार्च २००७

| सन २००५-०६ रु. पैसे | खर्च | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|
| १,२०,८४,६७२.५० | मागील पानवरुन........ | १,५२,६३,५८७.३० |
| १७,७५३.०० | अधिकर्ष व्याज खर्च | १,१६,३३५.५५ |
| १४,०५२.०० | सर्व्हीस टॅक्स | ३१,४४०.०० |
| २,२५०.०० | कर व परवाना फी | ९,८५६.०० |
| ३७,०००.०० | अतिरिक्त लाभ कर | १८,३१२.०० |
| २०,०४३.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १९,५५४.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी तरतूद | ५,०००.०० |
| ३९,५२१.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | ८०,८७०.०० |
| ४७,४००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ३४,२००.०० |
| ३,०८८.०० | शिपाई गणवेश खर्च | ०.०० |
| ७,९५१.०० | फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च | ७,५४२.०० |
| ४,८७४.०० | भेट व तपासणी खर्च | २४,८४९.०० |
| ०.०० | थकित व्याज निधी तरतूद | ६६,०००.०० |
| ०.०० | लॉकर भाडे | १,०००.०० |
| ५,४८,७८२.०० | घसारा | ५,८०,७७१.०० |
| ११,६६,२४४.५० | निव्वळ नफा ताळेबंद वर्ग | १०,९२,६६७.८७ |
| १,३९,९८,६३१.०० | एकुण | १,७३,५१,९८४.७२ |

दिनांक : १६-७-२००७
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

**श्री. रतिकांत आर. पिंगळे**
अंतर्गत हिशोब तपासणीस

**श्री. विजय बं. मोरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २००५-०६ रु. पैसे | उत्पन्न | सन २००६-०७ रु. पैसे |
|---|---|---|
| १,३९,९८,६३१.०० | मागील पानवरुन........ | १,७३,५१,९८४.७२ |
| १,३९,९८,६३१.०० | एकुण | १,७३,५१,९८४.७२ |

**श्री. कृष्णा पां. धुमाळ**
खजिनदार

**श्री. बाळासाहेब वि. ताकवले**
सचिव

**श्री. कैलास वि. खोपडे**
अध्यक्ष

## अंतर्गत हिशोब तपासणीसांचा अहवाल :-

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

आम्ही पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई या संस्थेचे सोबत जोडलेले ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ अखेरचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल सादर करतो की,

१) आम्हाला लेखापरिक्षणाच्या उद्देश्यासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे/माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध आहेत.

२) आमच्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या १९६० या कायदा व त्या खालील नियम व संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असलेली योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवल्याचे आमच्या तपासणीत आढळून आले.

३) आम्ही तपासलेले सोबतचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक ही संस्थेने हिशोबाच्या पुस्तकानुसार तयार केली आहे.

४) आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे संस्थेने सदर हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या कायद्यानुसार,

अ. ३१ मार्च २००७ अखेरचा ताळेबंद संस्थेची खरी व योग्य स्थिती दर्शवित आहे.

ब. त्याच दिवशी संपणाऱ्या काळातील नफा - तोटा पत्रक संस्थेला झालेल्या निव्वळ नफ्याबाबत खरी व योग्य स्थिती दर्शविते.

५) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

सही

**आर. आर. पिंगळे**

चार्टर्ड अकौटंट

अंतर्गत हिशोब तपासणीस

स्थळ : नवी मुंबई

दिनांक : १६-०७-२००७

## अंदाज पत्रक सन २००७-२००८

(रू. लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २००६-०७ | प्रत्यक्ष उत्पन्न २००६-०७ | अंदाजे उत्पन्न २००७-०८ |
|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | १४८.०० | १४३.५७ | १९०.६६ |
| गुंतवणुकीवरील व्याज व लाभांश | २७.०० | २६.४७ | ३४.०० |
| इतर उत्पन्न | २.२५ | ३.४७ | ५.०० |
| एकूण रू. | १७७.२५ | १७३.५१ | २२९.६६ |

| खर्च तपशिल | अंदाजे खर्च २००६-०७ | प्रत्यक्ष खर्च २००६-०७ | अंदाजे खर्च २००७-०८ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ८७.०० | ८८.३४* | ११८.५० |
| कर्मचारी पगार खर्च | १९.०० | २०.१९* | ३०.०० |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | २३.२५ | २७.२६* | ३१.५० |
| छपाई व स्टेशनरी खर्च | ३.५० | २.५३ | ३.५० |
| वार्षिक सभा व संचालक सभा भत्ता | ०.८५ | ०.५४ | ०.९५ |
| प्रवास व किरकोळ खर्च | ३.५० | २.०७ | ३.०० |
| विमा व पोस्टेज खर्च | ०.८० | ०.४१ | ०.५२ |
| विज, फोन, पाणी, कर, भाडे | ९.०० | ८.१९ | १०.१५ |
| देखभाल व दुरुस्ती, पुजा, उद्घाटन | २.५० | १.८८ | २.५० |
| ऑडिट फी, व्यवसाय शुल्क | १.८० | १.४५ | १.७५ |
| वार्षिक देखभाल कंत्राट, वर्गणी व्यवसाय कर | २.०० | १.८८ | २.२५ |
| ओ.डी.व्याज, बँक चार्जेस | ०.७० | १.३२* | १.७५ |
| घसारा | ८.५० | ५.८१ | १०.०० |
| तरतुदी | १.७५ | ०.७१ | १.०० |
| नफा | १३.१० | १०.९३ | १२.२९ |
| एकूण रू. | १७७.२५ | १७३.५१ | २२९.६६ |

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मासिक सभेत मंजुरी दिली असुन वार्षिक सभेत सदर खर्चास मंजुरीसाठी शिफारस करत आहे.

## परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई - ४०० ७०३. |
| मुख्य कार्यालय | : | अे/३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस्.आर. (सी.आर.) ९५१-९७. |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा . |
| शाखा | : | सात (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त सात शाखा) |
| सभासद संख्या | : | ४५९५ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. ९५,३५,५००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ८९,७९,९९२.०० |
| ठेवी | : | रु. १५,०७,८९,४७९.०० |
| कर्जे | : | रु. ११,८२,००,२८१.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. ३,३२,५१,८५०.०० |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १०,९२,६६७.८७ |
| कर्मचारी वर्ग | : | २७ |
| खेळते भांडवल | : | रु. १७,३२,६६,२१४.२४ |

## संचालक कर्जाचा तपशील :-

| ३१-०३-२००७ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००७ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| २,७९,३०७.०० | ००.०० | ००% |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील :-

| ३१-०३-२००७ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००७ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| १८,९२,२४३.०० | ००.०० | ००% |

## संस्थेचे गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७३,९६,५५० | ७७,०३,८०० | ७८,४६,००० | ८३,३८,५०० | ९५,३५,७०० |
| गुंतवणूक | १,२५,४७,१३० | १,९२,१३,९४८ | २,००,९८,८५० | ३,०२,९८,८५० | ३,३२,५१,८५० |
| ठेवी | ४,६८,५६,२४८ | ७,२४,१८,७८४ | ८,७५,६७,६२८ | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ |
| कर्जे | ४,४२,७३,५७३ | ५,६४,१७,५११ | ६,९५,०५,४२१ | ८,०४,५४,७५५ | ११,८२,००,२८१ |
| खेळते भांडवल | ६,५१,३८,२९५ | ८,७७,१७,८५३ | १०,४९,१०,२८३ | १२,९६,१२,२१४ | १७,३२,६६,७६४ |

## सभासदांना सूचना :-

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी अपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

## विविध ठेव योजना :-

### 'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत..... कुटुंबातील सर्वांसाठी

#### मासिक प्राप्ती योजना

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी
रु, १,१४,३५०/- गुंतवा व दरमहा
रु. १०००/- पेन्शन रुपी व्याज मिळवा

#### शुभकार्य ठेव योजना

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

#### व्याजदर (दि. १/०७/२००७ पासून)

| | |
|---|---|
| ४६ ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ ते १२ महिने | ९.००% |
| १३ महिने ते २४ महिने | १०.५०% |
| २५ महिने व अधिक | १०.००% |

#### लखपती मुदत ठेव योजना

| | | |
|---|---|---|
| रु. ६२,१००/- | ५ वर्षात | रु. १ लाख |
| रु. ५८,२५०/- | ६८ महिन्यात | रु. १ लाख |

#### दामदुप्पट ठेव योजना

डबल धमाका

आपली रक्कम
८४ महिन्यात
दामदुप्पट

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते

## विविध कर्ज योजना :-

### स्वप्न तुमचे .... सहाय्य आमचे

- गृहपयोगी उपकरणे
- फर्निचर
- संगणक
- शिक्षण
- वाहन
- मशिनरी
- घरदुरुस्ती
- लग्नकार्य
- वैद्यकीय
- धार्मिक कार्य
- व्यवसाय वृद्धी

#### विविध कर्ज योजना

**वैयक्तीक कर्ज**
रु. ७५,०००/- पर्यंत
व्याज दर १६%

**वाहन तारण कर्ज**
रु. ७.५० लाख पर्यंत
व्याजदर १५%

**तारण कर्ज**
रु. १०.०० लाख पर्यंत
व्याजदर १५%

**तत्काळ कर्ज**
ठेव तारण
LIC/NSC
तारण



कोपरखैरणे शाखा उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मा. सौ. मनिषा भोईर (महापौर, नवी मुंबई) यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास खोपडे



सिंहगड रोड शाखेचे फित कापून उद्घाटन करताना मा. आमदार श्री. कुमारभाऊ गोसावी, मा. सौ. अनुपमा लिमये (नगरसेविका, म.न.पा. पूणे) व अन्य मान्यवर



कोपरखैरणे शाखा उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर सभासद



सिंहगड रोड शाखा उद्घाटन प्रसंगी सौ. अनुपमा लिमये (स्थानिक नगरसेविका, म.न.पा. पूणे) यांचे स्वागत करताना उपाध्यक्ष श्री. दशरथ बडदे



राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रवचनकार श्री. संपतराव भोसले गुरुजी यांनी आपले प्रवचनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



संस्थेचे हितचिंतक श्री. संपत (आप्पा) वाल्हेकर (मालक सोमनाथ दुग्धालय, सिंहगड रोड) यांचा सत्कार करताना सचिव श्री. बाळासाहेब ताकवले

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

**वाशी**
अे-३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३
फोन : २७८०२६५९

**नेरुळ**
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर - ८, नेरुळ,
नवी मुंबई - ४०० ७०६ फोन : ३२५९६९८५

**दादर**
१०९, 'बी' विंग, गुरुकृपा हौ. सोसायटी, न. चि. केळकर रोड, प्लाझा सिनेमा
समोर, दादर (प), मुंबई - ४०० ०२८. फोन : २४३०३७३४

**कोपरखैरणे**
शॉप नं. २, प्लॉट नं. १९, स्वागत अपार्टमेंट, सेक्टर-३, कोपरखैरणे,
नवी मुंबई - ४०० ७०९ फोन : ३२४८६८०६

**न्यू पनवेल**
अश्वमेध, शॉप नं. १७, प्लॉट नं. १८, सेक्टर -८, सातारा सह. बँकेसमोर,
खांदा कॉलनी, न्यू पनवेल - ४१० २०६ फोन : ९८६९८०१०१६

## पुणे विभाग

**धनकवडी**
सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे - सातारा रोड,
धनकवडी, पुणे - ४०० ०४३ फोन : ०२०-३२९०६७४६

**हडपसर**
अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर रोड, हडपसर,
पुणे - ४०० ०२८ फोन : ०२०-३२५१७६७१

**सिंहगड रोड**
सर्व्हे नं. १९/१७, आनंद नगर, सोमनाथ दुग्धालयाजवळ, सिंहगड रोड,
पुणे - ४११ ०५१ फोन : ०२०-३२५३११०२

**चंदननगर**
बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. ४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर,
पुणे - ४११ ०१४. फोन : ९२२१०४२३१८

प्रेषक :

**पारिजात को - ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई**

अे-३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी,
नवी मुंबई - ४०० ७०३ फोन : २७८०२६५९

बुक - पोस्ट

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________